# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

जा. क्र. ९६२/२०१४-१५ दिनांक : २५ नोव्हेंबर २०१४

## (फक्त सभासदांसाठी)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची इ. स. २०१३-१४ (१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४) ची सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १४ डिसेंबर २०१४ रोजी दु.१.०० वा. परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांचे अध्यक्षतेखाली यशवंत नाट्यमंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे होणार आहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य द्यावे, ही विनंती.

## - सभेपुढील विषय -

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सुधारणासह समंत करणे.
२. इतिवृत्तातून निर्माण होणाऱ्या मुद्यांवर विचार करणे.
३. परिषदेच्या १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व समंत करणे.
४. परिषदेच्या १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व समंत करणे.
५. परिषदेच्या १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
६. अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
७. इ. सन. २०१४-१५ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
८. इ. सन. २०१४-१५ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
९. सभासदांकडून रीतसर आलेल्या ठरावांवर व सूचनांवर चर्चा घडवून बहुमताने निर्णय घेणे.
१०. नाट्यसंकुल प्रगतीचा आढावा घेणे व निधीविषयी विचार करणे.
११. तहहयात विश्वस्त कै. मच्छिंद्र काबंळी आणि कै. जयसिंग चव्हाण यांच्या रिक्त झालेल्या जागेवर नवीन विश्वस्तांची नेमणूक करणे.
१२. परिषदेच्या भावी कार्यासंबंधी विचार करणे.
१३. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांची चर्चा करणे व ठराव संमत करून बहुमताने निर्णय घेणे.

आपला

(दीपक करंजीकर)
प्रमुख कार्यवाह.

## विशेष सूचना :

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. ज्या सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती माहिती दि.४ डिसेंबर ते ११ डिसेंबर २०१४ पर्यंत प्रतिदिनी दुपारी ४ ते सायं. ६ या वेळात परिषद कार्यालय, माटुंगा-माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे पुरविण्यात येईल.
३. वार्षिक सभेत ठराव/सूचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सूचना दि. १० डिसेंबर २०१४ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.
४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदांसाठी शाखेच्या कार्यालयात, तसेच मुंबईतील सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक .४ डिसेंबर २०१४ पासून अवलोकनार्थ उपलब्ध होईल व मागणी केल्यास उपलब्ध करून दिला जाईल.

## महत्त्वाचे निवेदन

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची सभासद संख्या (शाखा सभासदांसहित) अठरा हजाराहून अधिक आहे. या सर्वांना अहवाल पाठविण्यास वाढलेला टपालखर्च करणे आर्थिक तरतुदीच्या अभावी अशक्य आहे. त्यामुळे प्रतिवर्षी होणारा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा, नाट्य संमेलन, सत्कार आणि अन्य नाट्यविषयक कार्यक्रम हे वृत्तपत्राद्वारे सभासदांना कळविण्यात येतील. सर्व सभासदांनी परिषदेला याबाबतीत सहकार्य करावे ही विनंती.

आपला ईमेल आयडी पाठविल्यास वरील कार्यक्रम आपल्याला ईमेलद्वारे कळविण्यात येतील. कृपया आपला ईमेल आयडी कळवावा.